आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक १४ एप्रिल २०२४

ठळक बातम्या

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी - दीक्षाभूमीत उसळला जनसागर.

2. आरक्षणाला कोणालाही धक्का लावू देणार नाही: गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांची भंडाऱ्यातील साकोली इथं प्रचार सभेत ग्वाही.

3. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्याद्वारे भारतीयांचं जीवनमान उंचावण्याकडं आमचं विशेष लक्ष असल्याचं पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.

4. नागपूरसह पश्चिम विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात आज पावसाचा येलो अलर्ट: या आठवड्यात तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसची वाढ होण्याची शक्यता.

*****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती आज साजरी होत आहे. या निमित्तानं सर्वत्र विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आंबेडकर जयंतीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. बाबासाहेबांनी घालून दिलेल्या आदर्शांचं अनुसरण करण्याचं आणि देशाच्या सर्वसमावेशक विकासासाठी सामूहिकरित्या कार्य करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे. नागपुरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उत्साहाचं वातावरण आहे. नागपूरच्या दीक्षाभूमीत महामानवाला अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटला आहे. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नागपुरातील संविधान चौक इथं काल रात्री १२ वाजता हजारो बौद्ध अनुयायांनी एकत्र येत डॉ.बाबासाहेबांचा जयघोष करीत आनंद साजरा केला. रात्री १२ वाजता नागपुरातील विविध ठिकाणी आतिशबाजी करत आणि केक कापत एकमेकांना केक भरवण्यात आला. नागपुरात विविध ठिकाणी डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यात प्रामुख्यानं निरी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ आणि समता सैनिक दलाच्या कार्यक्रमांचा समावेश आहे. राज्यभरातल्या सर्व शासकीय आस्थापनांत डॉ. आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.नागपूर आकाशवाणीत देखील महामानवाला अभिवादन केल्यानंतर आकाशवाणी- दूरदर्शन एस्सी एसटी कर्मचारी कल्याण संघटनेच्या वतीनं अन्नदानाचा

उपक्रम राबविण्यात आला. नागपूर लोकसभा मतदारसंघातून एनडीए आघाडीचे उमेदवार आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज दीक्षाभूमीवर जाऊन महामानवाला अभिवादन केलं. यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेण्याचं आवाहन केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दीक्षाभूमीवर जाऊन महामानवाला अभिवादन केलं. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी देखील दीक्षाभूमीला भेट देऊन अभिवादन केलं. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रचलेलं संविधान हे आजघडीला वाचवणं ही खरी गरज आहे. या संविधानामुळं सामान्य नागरिकाला आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळेल, असं प्रतिपादन त्यांनी केलं. वर्धा इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आज 'विकसित भारत@ 2047' अंतर्गत 'डॉ बाबासाहेब भीमराव रामजी आंबेडकर यांचे विचार' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. हेलिकॉप्टरमधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. भीम जयंती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीनं अकोल्यातील अशोक वाटिकेत महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यावेळी उपस्थित होते. यावेळी बौद्ध अनुयायांनी श्वेतवस्त्र परिधान करून त्रिशरण पंचशील ग्रहण केलं. डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केलं.

<u>अमित शाह सभा/मल्लिकार्जुन खर्गे</u>

पहिल्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोचला आहे. गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह आज भंडारा जिल्ह्याच्या साकोली इथं करंजेकर कॉलेजच्या पटांगणात भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारार्थ सभेला उपस्थित आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री प्रफुल्ल पटेल आदी नेते उपस्थित आहेत. महायुतीचं इंजिन हे महाविकासाचं इंजिन आहे आणि यात सर्व सामाजिक घटकांचा समावेश आहे, असं प्रतिपादन फडणवीस यांनी केलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त अभिवादन करून अमित शाह यांनी संबोधनाला सुरुवात केली. आरक्षण हे नेहमी कायम राहील. त्याला धक्का लागू दिला जाणार नाही, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आपल्या सर्व सांस्कृतिक मानकांना जिवंत करण्याचं तसंच आतंकवादाला आळा घालण्याचं आणि नक्षलवाद जवळपास समाप्त करण्याचं काम आम्ही

केलं. गरीब, महिला, शेतकरी यांचं  जीवनमान उभारण्यासाठी आम्ही तजवीज केली, असं सांगून विकासाची गंगा अविरत सुरू ठेवण्यासाठी भाजपच्या उमेदवाराला विजयी करण्याचं आवाहन शाह यांनी  उपस्थित नागरिकांना केलं. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे नागपुरातील गोळीबार चौक इथं आज प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. नागपूर लोकसभा मतदार संघातील काँग्रेसचे उमेदवार आमदार विकास ठाकरे यांच्या प्रचारासाठी ही जाहीर सभा होत आहे.  नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात पहिल्या टप्प्यातील निवडणूक होत असून या पाचही मतदारसंघात राष्ट्रीय पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रचार सभा, रॅली, चौकसभा यासह घरोघरी जाऊन मतदारांना भेटण्यावरही भर दिला जात आहे. या पाच मतदारसंघात दिनांक १९ एप्रिलला मतदान होत आहे.

मतदान जनजागृती पदयात्रा

सिनीयर सिटीजन कौंसिल ऑफ नागपूरतर्फे आज  सकाळी ११ वाजता मतदान जनजागृती पदयात्रा आयोजित करण्यात आली.  जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. विपीन इटनकर, सहाय्यक समाज कल्याण आयुक्त सुकेशिनी तेलगोटे आणि जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यावेळी उपस्थित  होते.  कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोहर खर्चे होते. मानेवाडा चौक ते उदयनगर चौक असा या पदयात्रेचा मार्ग होता.

भाजप संकल्पपत्र

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं आज दिल्लीतील मुख्यालयात निवडणूक जाहीरनामा संकल्पपत्र प्रसिद्ध केलं.  यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांसह इतर प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित होते. रोजगारासह उद्योजकतेवर भर, मोफत शिधा योजनेला मुदतवाढ, गरिबांसाठी तीन कोटी घरं बांधण्यासह परवडणारं पौष्टिक अन्न तसंच त्यांचा वीज देयकाचा भार कमी करून शून्य करण्याचं आश्वासन यात देण्यात आलं आहे. पाच लाख रुपयांपर्यंत विमा आणि मोफत उपचार, ७० वर्षांवरचे ज्येष्ठ तसंच तृतीयपंथीयांना आयुषमान भारत योजनेचा लाभ देणं, नलिकांद्वारे स्वस्त गॅस घरात पोहोचवणं, लखपती दीदी सारख्या योजनांसह महिला सक्षमीकरण, मुद्रा योजना लाभ वाढवणं, ‘पीएम किसान’ योजना कायम ठेवणं आदी मुद्दे भाजपच्या जाहीरनाम्यात आहेत. हा जाहीरनामा युवा, शेतकरी, महिला शक्ती, गरिबांवर आधारित असून भारतीयांचं  जीवनमान उंचावण्याकडं आमचं  विशेष लक्ष आहे, असं पंतप्रधान  यावेळी म्हणाले. हा जाहीरनामा तयार

करण्यासाठी ज्येष्ठ नेते संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या २७ सदस्यीय समितीच्या दोन बैठका झाल्या. नमो अॅप च्या माध्यमातून सुमारे चार लाख आणि चित्रफितींच्या माध्यमातून सुमारे ११ लाख सूचना समितीला मिळाल्या होत्या. दरम्यान, भाजपच्या जाहीरनाम्यावर टीका करतांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले की सत्तेत असताना १० वर्ष शेतकरी, छोटे व्यापारी, तरुणांना वाऱ्यावर सोडणाऱ्या भारतीय जनता पक्षाला लोकसभेच्या निवडणुकीत पुन्हा त्यांची आठवण झाली असून जाहीरनाम्यात त्यांचा उल्लेख केलेला आहे. भाजपनं या सर्व गटांना आश्वासन देऊन फसविलं. त्यामुळं आता भाजपच्या फसव्या आश्वासनांना जनता बळी पडणार नाही. आज नागपूर इथं पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

<u>बातमीपत्र बदल-मुंबई आकाशवाणी</u>

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारानं देशभरात वेग घेतला आहे. आकाशवाणीवरूनही राजकीय पक्षांना प्रचारासाठी निश्चित वेळ उपलब्ध करून दिली गेली आहे. हे कार्यक्रम उद्यापासून प्रसारित होणार आहेत. यामुळं आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरून दुपारी ३ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या आणि परवा म्हणजेच १५ आणि १६ एप्रिल रोजी दुपारी ३ ऐवजी संध्याकाळी ४ वाजता प्रसारित केलं जाणार आहे.

<u>क्रेडिट सिस्टीम शिक्षण</u>

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक सत्र २०२४-२५ पासून इयत्ता ६ वी, ९ वी आणि ११ वी मध्ये क्रेडिट सिस्टीमद्वारे शिक्षण दिलं जाणार आहे. क्रेडिट सिस्टीम ही प्रणाली पायलट प्रोजेक्ट म्हणून लागू करण्याची तयारी बोर्डानं केली आहे. नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क अंतर्गत हा उपक्रम राबवला जाणार आहे.क्रेडिट सिस्टीम या प्रणाली अंतर्गत जर विद्यार्थ्यांनी इयत्ता 9 वी मध्ये वर्षातून 210 तास अभ्यास केला, तर त्यांना 40 ते 54 क्रेडिट गुण मिळतील. सर्व विषयांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच हे क्रेडिट दिलं जाईल. यासाठी वर्षभर वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असणार आहे. विद्यार्थ्याला मिळणारे क्रेडिट्स शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये जोडले जातील. विद्यार्थ्याला इयत्ता ९ वी साठी ऑफर केलेल्या संभाव्य क्रेडिटनुसार पाच विषय उत्तीर्ण करावे लागतील. त्यात दोन भाषा आणि तीन विषयांचा समावेश असेल. प्रत्येक विषयासाठी २१० तास असतील. तसंच १५० तास मूल्यांकन, शारीरिक शिक्षण, कला शिक्षण आणि कार्यानुभवासाठी दिले जाणार आहेत.

हवामान

आज सकाळी नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी पाऊस झाला. नागपूर शहरात मात्र आज पावसानं विश्रांती घेतली. त्यामुळं तापमानात काहीशी वाढ झाली. आज सकाळी नागपूर विमानतळावर किमान तापमान २१.८ डिग्री सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. दरम्यान, नागपूरसह पश्चिम विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात आज पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर उद्या संपूर्ण विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. मागील २४ तासांत अकोला, वाशीम आणि बुलढाणा जिल्ह्यात किमान तापमानात वाढ नोंदविण्यात आली असून बुलढाणा जिल्ह्यात उष्माघाताचे एकूण १२ रुग्ण आढळून आले. या आठवड्यात तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसची वाढ होण्याची शक्यता असल्यानं नागरिकांनी पाणी जास्त पिणं, बाहेर पडताना डोक्यावर रुमाल बांधणं, दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात बाहेर न पडणं इत्यादी सूचना जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आल्या आहेत.

*****